ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - IX Issue - II May - October - 2021

English / Marathi / Hindi Part - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.571
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Govt. College of Arts & Science * Aurangabad *

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - IX, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2021
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.571 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बोरकरांची कविता आणि पार्थिव अपार्थिव<br>**आनंद वसंत डूडूल** | १-६ |
| २ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा बी एड कोर्स वर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. कांबळे गोविंदराव शंकरराव** | ७-१४ |
| ३ | उच्च शिक्षण व बदलते शैक्षणिक धोरण : २०२०<br>**प्रा. डॉ. रत्ना जवरास** | १५-१९ |
| ४ | राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा इतिहास व विकास<br>**डॉ. वैशाली देशमुख** | २०-२३ |
| ५ | महात्मा ज्योतीराव फुलेंचे शिक्षणविषयक विचार<br>**डॉ. मधुकर चाटसे** | २४-२६ |
| ६ | कोरोना काळ आणि शिक्षणातील सकारात्मक व नकारात्मक बदल<br>**डॉ. सागर लोकनाथ बडगे** | २७-३० |
| ७ | महिला सबलीकरण आणि औरंगाबाद शहरातील स्वच्छतागृहांची स्थिती : एक आढावा<br>**मनिषा माधवराव निकम** | ३१-३७ |
| ८ | भारतीय संघराज्य आणि प्रादेशिकवाद<br>**ईश्वर सुभाष तांबे** | ३८-४३ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार<br>**विजय लिंबाजीराव कोल्हे** | ४४-४८ |
| १० | मराठी साहित्यातील थोर लेखकांच्या अनुवादाचा आढावा<br>**प्रा. रमेश बलभीम जाधवर** | ४९-५२ |




Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - IX, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2021
**GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.571** (www.sjifactor.com)

# ४. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा इतिहास व विकास

**डॉ. वैशाली देशमुख**
विभाग प्रमुख (संगीत), शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतातील शिक्षण परंपरा अतिशय प्राचीन परंपरा आहे, प्रथमत: आईवडीलांकडूनच मानवाच्या जीवनात शिक्षणाचे कार्य सुरू होते, सामान्यत: इ.स.पू. २५०० पासून इ.स.१००० पर्यंतचा काळ प्राचीन काळ मानला जातो. पुर्विच्या काळी शिक्षण ही मुख्यत: वैयक्तीक बाब होती. तत्कालीन शिक्षण यज्ञसंस्थेभोवती गुंतलेले होते. ऋग्वेद काळात पाठांतराने वेदांचे जतन करणे हाच शिक्षणाचा प्रमुख हेतू होता. वैदिक काळातील शिक्षणातून संस्कृत भाषा, विचार, तत्वज्ञान आणि अध्ययनपध्दती यांचा विकास झाला. गुरूकुल पध्दतीने चालणाऱ्या शिक्षणपध्दतीत गुरूगृही शिक्षण होई. बौध्द धर्माच्या उदयानंतर अध्ययन-अध्यापनात सुसूत्र वाङमयाचा उपयोग होवू लागला. शिक्षा, छंद, व्याकरण, निरूक्त, कल्प आणि ज्योतीष आदिंचा त्यात समावेश होता. सुत्रकाळ हा पाणिनीपासून सुरू होतो आणि पंतजलीबरोबर संपतो. पाणिनीच्या काळात गुरूकूल उपनयन, पाठांतर या गोष्टींबरोबर स्त्रियांना शिक्षण घेता येत असे. सुत्रकाळात शिक्षण तात्विक विषयांवर होते. रामायण, महाभारता सारख्या काळात धर्म-तत्वज्ञान, धनुर्विद्या, अस्त्रविद्या यांचा समावेश शिक्षणात होता. तत्कालीन शिक्षणाची केंद्रे गुरूकुल, वैदिक संघ, चरक आणि मठ इ. होती, या केंद्रामध्ये वसतिगृह, रूग्णालयांचाही समावेश होता. शिक्षणात स्त्रियांनाही स्थान होते. त्या काळात तक्षशिला आणि नालंदा ही उच्च शिक्षणाची विद्यापीठे होती. तत्वज्ञानापासून ते धनुर्विद्येपर्यंतचे सर्व विषय शिकविले जात. विद्यार्थ्यांना ऐच्छिक विषय निवडता येत होता तक्षशिला विद्यापीठात औषधशास्त्र, कायदा आणि युध्दशास्त्र यांचे अभ्यासक्रम उपलब्ध होते. प्राचीन भारतात विद्यापीठीय पातळीवरील केंद्रे तक्षशिला, नालंदा, वलभी, विक्रमशिला, जगद्दला, उदंडपूर, मिथिला, नाडिया इ. ठिकाणी होती. यातील वलभी सोडुन सर्व केंद्रे बिहार-बंगाल मधील गंगेच्या तीरावर होती. पुढे विविध आक्रमणांमुळे ही विद्यापीठे बंद पडत गेली.

भारतात युरोपियनांच्या जसजसा प्रभाव पडत गेला तसतसा भारतीयांना आधुनिक शिक्षणाची ओळख झाली. कोलकता जवळील श्रीरामपूर येथील डॅनिश मिशनमधील फेलिक्स कॅरे, विलियम बोर्ड, जॉन मार्श यांनी संस्कृत, बंगाली, हिंदी, मराठी या भारतीय भाषांचा अभ्यास केला. फेलिक्स कॅरे यांनी बंगाली भाषेत विश्वकोष लिहिला. वॉर्ड यांनी 'बायबल' चा बंगाली भाषेत अनुवाद प्रकाशित केला. कोलकता, ढाका चितगाव येथे इंग्रजी भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू केल्या, इ.स.१८१८ साली श्रीरामपूर येथे बाप्टीस्ट मिशन कॉलेज सुरू केले. इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतात अनेक विद्यालये स्थापन केली. इ.स.१८२३ साली 'कोलकता स्कूल सोसायटी व कोलकता स्कूल बुक सोसायटी' यांना अनुदान दिले. १८२४ साली कोलकता येथे संस्कृत महाविद्यालय स्थापन केले.



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण आयोग खालील प्रमाणे आहेत.

१. इ.स. १८१३ साली चार्टर ॲक्ट आला त्यामध्ये शिक्षण पारंपारिक की पाश्चिमात्य यावर वाद होता.

२. इ.स. १८३४ साली भारतीय शिक्षणपध्दत्तीची सुरूवात झाली.

३. इ.स. १८५४ साली चार्ल्स वुड यांनी पाश्चिमात्य ज्ञानावर भर देवून मद्रास, कलकत्ता, मुंबई या विद्यापीठांची स्थापना झाली.

४. इ.स. १८८२ साली माहात्मा फुलेंनी हंटर आयोगापुढे प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठिय शिक्षणामध्ये स्त्री शिक्षणावर भर दिला.

५. इ.स. १९०२ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी उच्च शिक्षणासाठी भारतीय विद्यापीठ आयोग मांडला.

६. इ.स. १९३७ वर्धा शिक्षण योजनेची स्थापना महात्मा गांधी यांनी केली यामध्ये स्वावलंबी शिक्षण, विद्यार्थी केंद्रिय शिक्षण, हस्तव्यवसाय शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण व ७ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तिच शिक्षण होतं.

७. इ.स. १९१६ साली म्हैसुर व बनारस विद्यापीठे स्थापन झाली.

८. इ.स.१९१७ साली पाटणा, उस्मानिया विद्यापीठे स्थापन झाली.

९. इ.स. १९१८ साली हैद्राबाद विद्यापीठे स्थापन झाले.

१०. इ.स. १९२० साली अलिगढ विद्यापीठ स्थापन झाले.

११. इ.स. १९२१ साली लखनौ विद्यापीठ स्थापन झाले.

१२. इ.स. १९२१ साली काशी विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठांची स्थापना झाली. त्यानंतर विद्यापीठांच्या कामांमध्ये समन्वय साधण्यासाठी 'इंटर युनिव्हर्सिटी बोर्ड' स्थापन करण्यात आले.

इ.स. १९३७ ते १९४७ या काळामध्ये सर्व स्तरातील शिक्षणाच्या प्रमाणावर भर दिला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ साली डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोग (युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन) नेमण्यात आला. उच्च शिक्षण क्षेत्रातील हा महत्त्वाचा निर्णय होता. या आयोगाच्या शिफारसीप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. अनेक नवी विद्यापीठे, नवी महाविद्यालये मोठ्या प्रमाणात उघडली गेली. प्राध्यपकांनी Ph.D., M.Phil असावे, त्यांच्या वेतनश्रेणी सुधाराव्यात, त्यांना भविष्य निर्वाह निधी, परीक्षा पध्दत्तीत सुधारणा, स्वायत्त महाविद्यालये इ.सुचना केल्या गेल्यात.

इ.स. १९६८ व १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यापीठ पातळीवरील शिक्षणास फारसा बदल झाला नाही. इ.स. १९८६ च्या शिक्षणाच्या राष्ट्रीय धोरणाची जागा नवे धोरण घेणार आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा याची उभारणी करण्यात आली आहे.



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

बालवयाच्या सुरूवातीस शिक्षणावर भर देत १०+२ या शालेय अभ्यासक्रम आकृती बंधाची जागा आता ५+३+३+४ अभ्यासक्रम आराखडा अनुक्रमे = ३-८, ८-११, ११-१४, १४-१८ वयोगटसाठी राहील.

२१ व्या शतकाची प्रमुख कौशल्ये, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सात्मक विचार वाढविण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि अनुभवातून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा उद्देश असेल. इयत्ता ३, ५ आणि ८ वी मध्ये सर्व विद्यार्थी शालेय परीक्षा देतील जी योग्य यंत्रणेव्दारे घेण्यात येईल. १०वी व १२वी साठी शिक्षण मंडळाच्या (बोर्ड) परीक्षा सुरूच राहतील मात्र त्यांची पुर्नरचना केली जाईल.

व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामध्ये शिक्षण संस्थामध्ये ३.५ कोटी नवीन जागा वाढविण्यात येतील. पदवी शिक्षण ३ किंवा ४ वर्षाचे असून शकते आणि या कालावधीत अनेक प्रमाणीकरण असू शकतात. वेगवेगळ्य उच्च शिक्षण आणि संशोधन विद्यापीठांची स्थापना (MERU) करून जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुशाखीय शिक्षणासाठी आदर्श स्थापित करता येईल शैक्षणिक संस्थाकडुन डिजीटल संग्रहीत करून अकॅडमिक बँक ऑफ क्रडीट ची स्थापना केली जाईल.

नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली जाईल. या संस्थेच्या माध्यमातून संशोधन संस्कृती आणि उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षमता वृध्दिंगत करण्यात येईल.

भारतीय उच्च शिक्षण आयोगाची (HECI) स्थापना करण्यात येईल HECI चे चार स्वंतत्र घटक असतील.

Higher Education Council of India

१. राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परीषद (NHECRC) नियमनासाठी.

२. जनरल ऐज्युकेशन कौंसिल (GEC) दर्जात्मक व्यवस्थेसाठी.

३. उच्च शिक्षण अनुदान आयोग (HEGC) निधीसाठी.

४. राष्ट्रीय मुल्यांकन परीषद (NAAC) मुल्यांकनासाठी.

महाविद्यालयांची संलग्नता १५ वर्षात समाप्त केली जाणार आहे आणि कालांतराने प्रत्येक महाविद्यालय स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय म्हणून विकसित होईल .

संपूर्ण देशामध्ये कोविड -१९ झालेला प्रसार लक्षात घेवून दर्जेदार शिक्षणासाठी पर्याय शोधण्यात आलेले आहेत, मनुष्यबळ विकास मंत्रालयामध्ये इ. शिक्षणाच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी डिजीटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक सामुग्री तयार करणारे विभाग तयार केले जातील.

नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम (NETF) म्हणजेच राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच या स्वायत संस्थेची निर्मिती करण्यात येणार असून याव्दारे विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ मंच उपलब्ध करूण देण्यात येणार आहे.

पुढची पिढी आत्मनिर्भर भारतासाठी नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**संदर्भग्रंथ**

१. India's National Educatin Policy - 2020- Rusen Kumar.

२. राष्ट्रीय शिक्षा निती-मानव संसाधन विकास मंत्रालय

३. नई राष्ट्रीय शिक्षा निती - जगदिश नारायण पुरोहीत

४. निती शास्त्र प्रबोध - दाजी आपटे

५. नई राष्ट्रीय शिक्षा निती २०२०-राज आर.ए.एस.



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad